साप्ताहीक मराठी बातमी पत्र

SHABNAM NEWS

पिंपरी-चिंचवड-पुणे

www.shabnamnewsonline.in मराठी वृत्तपत्र,वृत्तवाहिनी,मराठी न्यूजपोर्टल

# शबनम न्यूज

» मुख्य संपादिका : शबनम सय्यद

बातमी व जाहिराती साठी संपर्क 7218327321

» SHABNAM NEWS » शुक्रवार दि.23/01/2026 » वर्ष 10 वे » अंक 17 » पाने 04 » RNI.NO.MHAMAR/2015/47384 » किंमत 10 रु.

## पिंपरी-चिंचवड महापौरपद सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित



शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या महापौरपदाची आरक्षण सोडत मुंबईतील मंत्रालयात पार पडली. या सोडतीमध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेसाठी महापौरपद 'सर्वसाधारण' (खुला गट) प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली. हे आरक्षण पुढील अडीच वर्षांच्या कालावधीसाठी, म्हणजेच 2026 ते 2028 या कालावधीत लागू राहणार आहे.

राजकीय अंकगणितामुळे महापौरपदावर भाजपची दावेदारी जवळपास निश्चित मानली जात असून, आता महापौरपद कोणत्या नगरसेवकाकडे जाणार, याबाबत शहराच्या राजकारणात उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

**पुढील प्रक्रिया काय?**

आरक्षण जाहीर झाल्यानंतर पुढील टप्प्यात विभागीय आयुक्तांमार्फत महापौर निवडीचा अधिकृत कार्यक्रम जाहीर करण्यात येणार आहे. त्यानंतर इच्छुक उमेदवारांकडून अर्ज दाखल केले जातील. साधारणपणे येत्या पंधरा दिवसांत विशेष सभा बोलावून नव्या महापौरांची औपचारिक निवड प्रक्रिया पूर्ण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**एससी प्रवर्गाला अद्याप प्रतीक्षा**

आतापर्यंत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या महापौरपदी खुला प्रवर्ग, नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) तसेच अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गातील नगरसेवकांना संधी मिळाली आहे. मात्र, अनुसूचित जाती (एससी) प्रवर्गासाठी महापौरपदाचे आरक्षण अद्याप लागू झालेले नाही. त्यामुळे भविष्यातील आरक्षण सोडतीकडे एससी प्रवर्गाचे लक्ष लागून राहिले आहे.

**नव्या नेतृत्वाकडे शहराचे लक्ष**

महापौरपदासाठी 'सर्वसाधारण' आरक्षण जाहीर झाल्याने पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात नव्या नेतृत्वाचा उदय होणार हे निश्चित मानले जात आहे. आगामी अडीच वर्षांचा महापालिकेचा कारभार कोणाच्या हाती जाणार, आणि त्या नेतृत्वाखाली शहराच्या विकासाला कोणती दिशा मिळणार, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## पुणे व खडकी छावणी परिषद पुणे महापालिकेत समाविष्ट होणार; प्रक्रिया सुरू

### खासदार मुरलीधर मोहोळ यांची माहिती

शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पुणे : पुणे आणि खडकी छावणी परिषद पुणे महानगरपालिकेत समाविष्ट करण्याची प्रक्रिया सुरु असून, यामुळे छावणी परिसरातील नागरिकांना अधिक सक्षम व दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध होतील, अशी माहिती केंद्रीय राज्यमंत्री तसेच पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी दिली. बुधवारी (21 जानेवारी) त्यांनी याबाबत सविस्तर भूमिका स्पष्ट केली.छावणी परिषदांच्या समावेशाबाबत बोलताना मोहोळ म्हणाले, "उत्तम नागरी सुविधा मिळाव्यात या उद्देशाने पुणे आणि खडकी छावणी परिषदांचा महापालिकेत समावेश केला जात आहे. या संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवणे आणि ती योग्य दिशेने पूर्ण करणे ही माझी जबाबदारी आहे." देशातील विविध शहरांमध्ये अशाच प्रकारे छावणी परिषदांचा महानगरपालिकांमध्ये समावेश करण्याची प्रक्रिया सुरु असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



**छावणी भागातील नागरिकांना दिलासा**

छावणी परिषदांच्या कार्यकक्षेत येणाऱ्या भागांमध्ये पाणीपुरवठा, ड्रेनेज, रस्ते, कचरा व्यवस्थापन, आरोग्य व शिक्षण यांसारख्या मूलभूत नागरी सुविधांबाबत दीर्घकाळापासून नागरिकांकडून तक्रारी केल्या जात होत्या. महापालिकेत समावेश झाल्यास या भागांना थेट पुणे महानगरपालिकेच्या सुविधा, निधी आणि योजनांचा लाभ मिळणार असून, विकासकामांना गती मिळणार असल्याचे चित्र आहे.

**पुणे महापालिकेचे विभाजन नाही – मोहोळ यांचा खुलासा**

याच वेळी पुणे महानगरपालिकेचे विभाजन करण्याबाबत विचार सुरु आहे का, या प्रश्नाला उत्तर देताना मोहोळ यांनी सध्या तरी अशी कोणतीही गरज नसल्याचे स्पष्ट केले. "सध्या पुणे महानगरपालिकेचे विभाजन करण्याची आवश्यकता वाटत नाही. मुंबईसारख्या मोठ्या शहरात प्रशासन व्यवस्थितपणे हाताळले जात असताना पुण्यात ते शक्य नाही, असे म्हणण्याचे कारण नाही," असे त्यांनी सांगितले. भौगोलिकदृष्ट्या पुणे हे मुंबईपेक्षा मोठे असले तरी सध्याच्या प्रशासकीय यंत्रणेमार्फत परिस्थिती हाताळता येऊ शकते, असे मत व्यक्त करत भविष्यात गरज भासल्यास विभाजनाबाबत विचार केला जाऊ शकतो, असेही त्यांनी सूचित केले.

**शहराच्या विकासाला नवी दिशा?**

पुणे आणि खडकी छावणी परिषदांचा महापालिकेत समावेश झाल्यास शहराच्या प्रशासकीय रचनेत मोठा बदल होणार असून, एकसंध नियोजनातून नागरी विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र, या प्रक्रियेत संरक्षण मंत्रालय, राज्य सरकार आणि स्थानिक प्रशासन यांच्यातील समन्वय महत्त्वाचा ठरणार आहे.

## भारत निवडणूक आयोगाच्या 'ईसी आयनेट' डिजिटल प्लॅटफॉर्मचे उद्घाटन

शबनम न्यूज मिडिया ग्रुप

मुंबई : भारत निवडणूक आयोगाने इंडिया इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन डेमोक्रसी अँड इलेक्शन मॅनेजमेंट (आयआयसीडीईएम)-2026 दरम्यान 'ईसीआयनेट (ईसीआयएनईटी)' या एकात्मिक डिजिटल प्लॅटफॉर्मचे उद्घाटन केले.

21 ते 23 जानेवारी 2026 दरम्यान भरत मंडपम, नवी दिल्ली येथे ही तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या संकल्पनेतून, तसेच निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू आणि डॉ. विवेक जोशी यांच्या सहकार्याने 'ईसीआयनेट'ची निर्मिती करण्यात आली असून, त्याची विकासाची घोषणा मे 2025 मध्ये करण्यात आली होती.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी सांगितले की, हा प्लॅटफॉर्म कायद्याच्या चौकटीत विकसित करण्यात आला असून तो 22 अनुसूचित भाषा आणि इंग्रजीत उपलब्ध आहे. जगभरातील निवडणूक व्यवस्थापन संस्थांनी त्यांच्या देशांतर्गत कायदे व स्थानिक भाषांनुसार अशाच डिजिटल प्लॅटफॉर्मच्या विकासासाठी भारतासोबत सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.




निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू यांनी ईसीआयनेटमुळे निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता वाढून निवडणूक संस्थांवरील विश्वास दृढ होईल, तसेच कार्यपद्धतीवर प्रभावी देखरेख, जलद निर्णयप्रक्रिया आणि माहितीचा वेगवान प्रसार शक्य होईल, असे नमूद केले. तर डॉ. विवेक जोशी यांनी या परिषदेमुळे तंत्रज्ञान आणि डिजिटल नवकल्पनांच्या वापराबाबत जागतिक सर्वोत्तम पद्धती जाणून घेण्याची संधी निवडणूक संस्थांना मिळणार असल्याचे सांगितले.

माहिती तंत्रज्ञान विभागाच्या महासंचालक डॉ.सीमा खन्ना यांनी सादरीकरणात सायबर सुरक्षेला ईसीआयनेट मुख्य आधारस्तंभ असल्याचे स्पष्ट केले.

आज तंत्रज्ञान केवळ सहाय्यक भूमिका बजावत नसून, ते धोरणात्मक सक्षमक बनले असल्याचे त्यांनी सांगितले. 'ईसीआयनेट'मुळे निवडणुकांमध्ये पारदर्शकता, कार्यक्षमता, विश्वासार्हता आणि जनतेचा विश्वास वाढेल, असेही त्यांनी नमूद केले.

## तुषार हिंगे यांना महापौर पदाची संधी द्यावी

### पिंपरीकरांची जोरदार मागणी

शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने पुन्हा एकदा एकहाती सत्ता मिळवत आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. 22 जानेवारी रोजी महापौर पदाच्या आरक्षणाची सोडत जाहीर झाल्यानंतर शहराचा पुढील महापौर कोण, याबाबत राजकीय वर्तुळात तसेच नागरिकांमध्ये उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. अशा परिस्थितीत भाजपचे अनुभवी व कार्यक्षम नगरसेवक, माजी उपमहापौर तुषार हिंगे यांना महापौर पदाची संधी द्यावी, अशी जोरदार मागणी पिंपरी विधानसभा मतदारसंघातून होताना दिसत आहे.



मागील भाजपच्या कार्यकाळात उपमहापौर म्हणून काम करताना तुषार हिंगे यांनी प्रशासनावर पकड, सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी घेतलेली ठाम भूमिका तसेच सभागृह चालविण्याची शिस्तबद्ध कार्यपद्धती यामुळे स्वतंत्र ओळख निर्माण केली होती. 2017 साली पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतर त्यांनी विकासकामे, नागरी सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा व स्वच्छतेसंदर्भातील प्रश्न प्रभावीपणे मांडले होते.

पिंपरी-चिंचवड शहरात चिंचवड, पिंपरी आणि भोसरी असे तीन विधानसभा मतदारसंघ आहेत. भाजपच्या आधीच्या कार्यकाळात चिंचवड व भोसरी या दोन्ही मतदारसंघांना महापौर पदाची संधी देण्यात आली आहे. मात्र, पिंपरी विधानसभा मतदारसंघाला आजपर्यंत भाजपच्या कार्यकाळात महापौर पदाची संधी मिळालेली नाही.

त्यामुळे यावेळी राजकीय समतोल राखण्यासाठी व पिंपरीच्या नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी या मतदारसंघाला महापौर पद देण्यात यावे, अशी भावना नागरिक, कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

तुषार हिंगे हे पिंपरी विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत असून, त्यांनी कायम पक्षसंघटन मजबूत ठेवण्याबरोबरच तळागाळातील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम केल्याचे चित्र दिसून येते. त्यांच्या शांत, संयमी व अभ्यासू नेतृत्वशैलीमुळे ते सर्व पक्षांच्या नगरसेवकांमध्येही स्वीकारार्ह चेहरा मानले जातात. त्यामुळे महापौर पदासाठी ते योग्य व सक्षम उमेदवार ठरू शकतात, असे मत अनेक जाणकार व्यक्त करत आहेत.

दरम्यान, आगामी महापौर निवडीबाबत भाजपच्या वरिष्ठ पातळीवर हालचालींना वेग आला असून, सामाजिक समतोल, राजकीय समीकरणे आणि अनुभव या सर्व बाबींचा विचार करून निर्णय घेतला जाईल, असे संकेत मिळत आहेत.

अशातच पिंपरी विधानसभा मतदारसंघातून "यावेळी संधी पिंपरीला आणि महापौर तुषार हिंगे" अशी जोरदार मागणी पुढे येत असून, भाजप नेतृत्व या मागणीला कितपत प्रतिसाद देते, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.







# पदोन्नतीसाठी शिक्षकांना 'टीईटी'ची सक्ती

शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पुणे : राज्यात शिक्षक संवर्गातून पदोन्नतीसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण होण्याची सक्ती करण्यात आली आहे. टीईटी उत्तीर्ण या अर्हतेबरोबरच पदोन्नतीसाठी आवश्यक अन्य अर्हता धारण केलेले शिक्षकच पदोन्नतीसाठी पात्र ठरणार आहेत.



शिक्षक सेवेत येऊ इच्छिणाऱ्या नव्या उमेदवारांसह सेवेत कार्यरत राहू इच्छिणारे शिक्षक, पदोन्नतीसाठी टीईटी उत्तीर्ण अनिवार्य असल्याचा निर्णय सर्वो च्च न्यायालयाने अलीकडेच दिला. निवृत्त होण्यास पाच वर्षे बाकी असलेल्या शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण होण्यातून सूट देण्यात आली. निवृत्त होणाऱ्या शिक्षकांना पदोन्नती हवी असल्यास पदोन्नतीसाठी त्यांनाही टीईटी उत्तीर्ण असणे बंधनकारक करण्यात आले.

टीईटी उत्तीर्ण होण्यासाठी दोन वर्षांची मुदतही दिली. त्यानंतर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्रप्रमुख) पदासाठी जाहीर केलेल्या विभागीय परीक्षेच्या पात्रतेमध्येही टीईटी उत्तीर्ण असण्याची तरतूद नमूद केली. या अनुषंगाने प्राथमिक शिक्षण संचालकांनी शिक्षक संवर्गातून पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्रप्रमुख) व विस्तार अधिकारी (शिक्षण) या पदावर पदोन्नती प्रकरणी कार्यवाही करण्याबाबतच्या पत्राला आता शिक्षण विभागाचे अप्पर सचिव शरद माकणे यांनी उत्तर पाठविले आहे.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने देशभरातील टीईटी उत्तीर्ण व टीईटी अनुत्तीर्ण शिक्षकांची माहिती संकलित करण्याचे आदेश राज्य, केंद्र शासित प्रदेशांना दिले आहेत. या पार्श्वभूमीवर प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनीही राज्यातील शिक्षणाधिकाऱ्यांना शिक्षकांबाबतची माहिती सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार प्राथमिक स्तरावर कार्यरत 2011 पूर्वी व त्यानंतर रुजू झालेले शिक्षक आणि टीईटी उत्तीर्ण असलेले शिक्षक, 2011 नंतर रुजू झालेले आणि टीईटी उत्तीर्ण झालेले शिक्षक, टीईटीतून सूट दिलेले शिक्षक याबाबतच्या माहितीचा अहवाल सादर करावा लागणार आहे.

# थेरगावमध्ये 'बारणे' वर्चस्व अबाधित

## महापालिका निवडणुकीत पुन्हा एकदा बारणे फॅक्टर निर्णायक

शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पिंपरी चिंचवड शहरातील थेरगाव परिसरात बारणे कुटुंबाचे राजकीय व सामाजिक वर्चस्व पुन्हा एकदा ठळकपणे अधोरेखित झाले आहे. नुकत्याच पार पडलेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत थेरगावमधील प्रभाग क्रमांक 23 आणि 24 मध्ये झालेल्या चुरशीच्या लढतीत गावकरी बारणे यांनी दणदणीत विजय मिळवत आपले वर्चस्व कायम राखले आहे.




या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटातून विश्वजीत बारणे, निलेश बारणे, राष्ट्रवादी पक्षाकडून माया बारणे, योगिता बारणे, तर भाजप पक्ष कडून तानाजी बारणे आणि अभिषेक बारणे हे सर्व उमेदवार विजयी झाले असून राष्ट्रवादी च्या योगिता बारणे यांना निवडून आणण्यात माजी नगरसेवक कैलास उर्फ बाबा बारणे यांना श्रेय जाते, थेरगावमध्ये बारणे आडनावाचा दबदबा आजही कायम असल्याचे स्पष्ट झाले आहे. निवडणुकीतील निकाल पाहता 'थेरगाव म्हणजे बारणे' ही ओळख पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

थेरगाव परिसरात बारणे समाजाची संख्या मोठी असून गावकरी आणि नागरिकांचा मोठा व संघटित पाठिंबा बारणे कुटुंबाला लाभत असल्याचे या निकालातून दिसून आले आहे. निवडणूक प्रचारादरम्यान स्थानिक प्रश्न, विकासकामांचा अनुभव आणि कुटुंबाचा दीर्घकाळचा राजकीय वारसा हे बारणे कुटुंबासाठी ताकदीचे मुद्दे ठरले.

या भागात वास्तव्यास असलेले मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांना मानणारा वर्ग मोठ्या प्रमाणावर आहे. सलग तिसऱ्यांदा खासदार म्हणून निवडून आलेले श्रीरंग बारणे हे एक कार्यक्षम, अभ्यासू आणि सर्वसामान्यांशी थेट संपर्क ठेवणारे लोकप्रतिनिधी म्हणून ओळखले जातात. त्यांच्या संसदीय कामगिरीचा आणि मतदारांशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्याचा थेट फायदा स्थानिक पातळीवर बारणे कुटुंबाला मिळत असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

थेरगावमध्ये यापूर्वीही हिरामण बारणे , निलेश बारणे, झामाताई बारणे आणि सिद्धेश्वर बारणे , कैलास बारणे यांनी दीर्घकाळ नगरसेवक म्हणून काम करत विकासकामांचा ठसा उमटवला आहे. तसेच माजी नगरसेवक कैलास बारणे, संभाजी बारणे,विशाल बारणे प्रवीण बारणे, सनी बारणे, माजी नगर सेवक संतोष बारणे, शिवसेनेचे संतोष बारणे ,सागर बारणे, यांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय राहून बारणे नावाचे वलय अधिक मजबूत केले आहे.

स्थानिक प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवणे, नागरिकांशी थेट संवाद, सामाजिक कार्यक्रमांमधील सहभाग आणि संकटाच्या काळात मदतीसाठी पुढे येणे ही बारणे कुटुंबाची ओळख बनली आहे. त्यामुळे केवळ निवडणुकीपुरतेच नव्हे तर वर्षभर बारणे कुटुंब जनतेच्या संपर्कात राहत असल्याचे चित्र आहे.

महानगरपालिका निवडणूक असो किंवा लोकसभा निवडणूक, थेरगाव आणि परिसरात 'बारणे फॅक्टर' नेहमीच निर्णायक ठरत आला आहे. बदलत्या राजकीय समीकरणांमध्येही बारणे कुटुंबाने आपले स्थान अबाधित ठेवले असून थेरगावमध्ये आजही "बारणे नावच काफी है" असेच चित्र दिसून येत आहे.एकंदरीत, थेरगावच्या राजकीय आणि सामाजिक जीवनात बारणे कुटुंबाचे वर्चस्व कायम असून, आगामी काळातही या भागातील राजकारणात बारणे हे नाव केंद्रस्थानी राहणार, हे या निवडणूक निकालाने स्पष्ट केले आहे.

# पिंपरीतील ४२३ उमेदवारांचे 'डिपॉझिट' जप्त!



शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत तब्बल 692 उमेदवार रिंगणात उतरले होते. मात्र मतदारांचा कौल स्पष्ट आणि एकतर्फी ठरल्याने 423 उमेदवारांची अनामत (डिपॉझिट) रक्कम जप्त झाली, तर केवळ 269 उमेदवारांची अनामत वाचली. हा निकाल शहरातील राजकीय वास्तव स्पष्टपणे अधोरेखित करणारा ठरला आहे.

या निवडणुकीत भाजपचे 123, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) 122, शिवसेना (शिंदे) 58, शिवसेना (ठाकरे) 46, काँग्रेस 47, वंचित आघाडी 36, आम आदमी पार्टी 32, मनसे 13, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) 11 आणि तब्बल 204 अपक्ष उमेदवार रिंगणात होते. निकालानुसार भाजपचे 84, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) 37, शिवसेना (शिंदे) 6 आणि एक अपक्ष असे एकूण 128 नगरसेवक निवडून आले. उर्वरित 564 उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला.

या निवडणुकीतील सर्वात लक्षवेधी बाब म्हणजे भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या दोन्ही पक्षांच्या एकाही उमेदवाराची अनामत रक्कम जप्त झाली नाही. याउलट,

शिवसेना (शिंदे) : 58 पैकी केवळ 14 उमेदवारांची अनामत वाचली, 44 जप्त

काँग्रेस : 47 पैकी फक्त 1 उमेदवाराची अनामत वाचली, 46 जप्त

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) : 5 जणांची अनामत वाचली, 6 जप्त

हा निकाल शहरातील द्विध्रुवीय राजकारण ठळकपणे दाखवतो. भाजप आणि राष्ट्रवादी (अजित पवार) यांनी संघटनात्मक ताकद, प्रभावी प्रचार आणि स्थानिक नेतृत्वाच्या जोरावर मतदारांवर पकड मजबूत ठेवली. याउलट काँग्रेस, ठाकरे गट, वंचित, आप आणि मनसे यांना मतांचे विभाजन, स्थानिक पातळीवर प्रभावी चेहरे नसणे आणि संघटनात्मक मर्यादा याचा फटका बसल्याचे स्पष्ट होते.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीत अनामत जप्तीचे प्रमाण हेच मतदारांचा कल किती स्पष्ट आहे याचे द्योतक ठरले आहे. आगामी काळात शहराच्या राजकारणात भाजप–राष्ट्रवादी (अजित पवार) या दोन पक्षांभोवतीच सत्ता व विरोधाची समीकरणे फिरताना दिसतील, असे चित्र या निकालातून स्पष्टपणे समोर आले आहे.

# थेरगावमध्ये विशाल नंदू शेठ बारणे यांच्या पुढाकारातून भव्य मोफत आरोग्य शिबिर

## शेकडो ज्येष्ठ नागरिक, महिला व गरजू रुग्णांना मिळाला थेट आरोग्य लाभ

शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पिंपरी-चिंचवड शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते तसेच थेरगाव परिसरात अनेक वर्षांपासून सामाजिक कार्याच्या माध्यमातून आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारे विशाल नंदू शेठ बारणे यांच्या वतीने भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे आरोग्य शिबिर बुधवार, 21 जानेवारी रोजी शिवशक्ती गणेश बोर्डे नगर, थेरगाव येथे उत्साहात पार पडले.



या शिबिरामध्ये मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया नोंदणी, सर्वसाधारण आरोग्य तपासणी, रक्तदाब व मधुमेह तपासणी आदी सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या. विशेष म्हणजे या उपक्रमाचा लाभ थेरगाव परिसरातील ज्येष्ठ नागरिक, महिला, कष्टकरी व सामान्य कुटुंबातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर घेतला.

आरोग्य शिबिरासाठी तज्ज्ञ डॉक्टर, परिचारिका व स्वयंसेवकांची विशेष टीम उपस्थित होती. तपासणीनंतर गरजू रुग्णांना पुढील उपचारांसाठी मार्गदर्शन, औषधोपचार सल्ला तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी आवश्यक नोंदणी करण्यात आली. त्यामुळे अनेक आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना दिलासा मिळाला.

यावेळी बोलताना विशाल नंदू शेठ बारणे म्हणाले, "थेरगाव परिसरातील नागरिकांना आरोग्याच्या मूलभूत सुविधा सहज उपलब्ध व्हाव्यात, हा या शिबिरामागील मुख्य उद्देश आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचविणे ही आपली सामाजिक जबाबदारी असून भविष्यातही अशा उपक्रमांची सातत्याने अंमलबजावणी केली जाईल."

विशाल बारणे हे थेरगाव परिसरातील युवा नेतृत्व म्हणून ओळखले जातात. शिक्षण, आरोग्य, सामाजिक मदत, युवक सक्षमीकरण अशा विविध क्षेत्रांत ते सातत्याने सक्रिय असून नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी नेहमीच पुढाकार घेतात. त्यांच्या या आरोग्य उपक्रमामुळे परिसरात सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून नागरिकांकडून विशेष कौतुक व्यक्त करण्यात आले.

आरोग्य शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते, स्वयंसेवक व नागरिकांचे सहकार्य लाभले. या उपक्रमामुळे थेरगाव परिसरात सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या नेतृत्वाची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.

# पिंपरीत एका व्यक्तीची १३ लाखाची फसवणूक

शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पिंपरी : सदनिका (फ्लॅट) विक्रीचा बनाव करून एका व्यक्तीची 13 लाख 10 हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार काशीद वस्ती, पिंपळे गुरव येथे उघडकीस आला आहे. ही घटना 29 जुलै 2021 ते 21 जानेवारी 2026 या कालावधीत घडली.




या प्रकरणी चंदू लक्ष्मण राठोड (38, पिंपळे गुरव) यांनी सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार राज लक्ष्मण राठोड याला पोलिसांनी अटक केली आहे. दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी संगणमत करून फिर्यादीला 20 लाख रुपयांत सदनिका देण्याचे आश्वासन दिले. सुरुवातीला 5 लाख रुपये घेऊन करारनामा केला आणि त्यानंतर वेळोवेळी रोख व ऑनलाइन स्वरूपात एकूण 13 लाख 10 हजार रुपये घेतले. फिर्यादीला सदनिकेचा ताबा दिला, मात्र खरेदी खत करून देण्याऐवजी टाळाटाळ केली. त्यानंतर फिर्यादीला कोणतीही कल्पना न देता आरोपींनी तिसऱ्या व्यक्तीला सदनिकेचे खरेदी खत करून दिले. इतकेच नव्हे तर, फर्निचर पाहण्याच्या बहाण्याने छायाचित्र काढून फिर्यादीच्या नावावर परस्पर 22 लाखांचे कर्ज काढून फसवणूक केली. सांगवी पोलीस तपास करत आहेत.

# तुंबाडनंतर राही बर्वेचा प्रयोगशील थ्रिलर 'मायासभा'

शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पुणे : 'तुम्बाड' या चित्रपटाने सिनेसृष्टीत वेगळाच ठसा उमटवणारे दिग्दर्शक राही अनिल बर्वे यांचा 'मयसभा' हा चित्रपट पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात प्रदर्शित झाला. "2007 साली 'पिफ'मध्ये प्रेक्षक म्हणून सुरु झालेला माझा प्रवास आज 'मयसभा'च्या स्क्रीनिंगपर्यंत पोहोचला आहे," असं बर्वे यांनी सांगितलं.




'मायासभा' हा त्यांचा एक वैयक्तिक प्रयोग असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. "हा चित्रपट कोणत्याही ठराविक चित्रपट रचनेत बसवायचा नव्हता. विशेषतः दुसरा अर्धा भाग अधिक प्रयोगशील आणि वेगळा आहे," असं बर्वे म्हणाले. त्यामुळे या चित्रपटात पारंपरिक कथानकाची अपेक्षा ठेवणाऱ्यांनाही नवीन अनुभव मिळेल.

चित्रपटाची मुख्य कथा सिने-विश्वातील कलाकार परमेश्वर खन्ना यांच्या भोवती फिरते. बॉलिवूड अभिनेता जावेद जाफरी यांनी परमेश्वर खन्ना या गुंतागुंतीच्या पात्राची भूमिका साकारली आहे. "तो नायकही नाही, खलनायकही नाही," असं बर्वे सांगतात. परमेश्वरची पत्नी जयमाला यांच्या एका कृतीमुळे त्याच्यावर आणि मुलगा वासूवर खोल परिणाम होतो, परंतु चूक कोणाची हे शेवटपर्यंत रहस्यच राहते.

ही कथा एक बंद पडलेल्या थिएटरमध्ये घडते. बर्वे यांच्या म्हणण्यानुसार, चित्रपटात चार प्रमुख पात्रं असली तरी सर्वात महत्त्वाचं पात्र हे थिएटरच आहे. धूर, मच्छर आणि अस्ताव्यस्त वातावरणामुळे ते थिएटर जणू एक अडगळीची खोली बनते. या थिएटरमध्ये दडलेला सोन्याचा खजिना हा कथेला रहस्यात्मक वळण देतो.

फक्त 25 जणांची टीम आणि 23 दिवसांत हा चित्रपट तयार झाला, कोणत्याही मोठ्या औद्योगिक पाठिंब्याशिवाय निर्माता गिरीश यांच्या पाठिंब्यामुळे हा चित्रपट पूर्ण झाला," असं बर्वे म्हणाले.

नात्यांची कसोटी आणि स्त्रीचा लढा : 'शॅडो बॉक्स'

कौटुंबिक वास्तव, मानसिक संघर्ष आणि नात्यांतील ताण यांची परिणामकारक मांडणी करणारा 'शॅडो बॉक्स' हा बंगाली-हिंदी चित्रपट 'पिफ'मध्ये प्रदर्शित झाला. कुटुंबासाठी सातत्याने झटणारी स्त्री. तिचा पती, सामाजिक उपेक्षेला सामोरा जाणारा माजी सैनिक आणि एका अनपेक्षित घटनेनंतर कुटुंबातील नात्यांवर येणारा ताण हा चित्रपटाचा मुख्य आशय आहे. चित्रपटाचे अभिनेते चंदन बिष्ट म्हणाले, "या चित्रपटात स्त्रीचा संघर्ष आणि कुटुंबासाठीची तिची ताकद ठळकपणे चित्रित करण्यात आली आहे.

स्त्रीवाद आणि निसर्ग संवर्धन साधणारा 'स्पायिंग स्टार्स' श्रीलंकन दिग्दर्शक विमुक्ति जयसुंदरा यांचा चित्रपट 'स्पायिंग स्टार्स' दाखवण्यात आला.

त्यानंतर त्यांनी संवाद साधला

ते म्हणाले, "आपण सध्या अशा वातावरणात जगत आहोत, जिथे निसर्गालाच संघर्ष करावा लागत आहे. त्यामुळे निसर्ग संवर्धन महत्वाचे आहे, या हेतूने 'स्पायिंग स्टार्स'ची निर्मिती केली आहे." अभिनेत्री इंदिरा तिवारी म्हणाल्या, "मनुष्य म्हणून आपण निसर्गाचे घटक आहोत आणि मनुष्य म्हणून आपण पुढच्या पिढीला काहीतरी देणं लागतो आणि हा चित्रपट हे त्याचे उत्तम उदाहरण आहे." या चित्रपटाच्या निर्मितीमध्ये श्रीलंका राष्ट्रीय चित्रपट महामंडळ, फ्रान्सचे सीएनसी यांचा सहभाग आहे. ऑक्टोबर 2024 मध्ये श्रीलंकेच्या मध्य भागातील डोंगराळ प्रदेशात याचे चित्रीकरण करण्यात आले आहे. स्वित्झर्लंडच्या 'व्हिजन्स सुड एस्ट' या निधीतूनही या चित्रपटाला पोस्ट-प्रॉडक्शनसाठी आर्थिक मदत मिळाली आहे.

# बी. डिझाईन सीईटीच्या प्रवेश नोंदणीला सुरुवात




बी. डिझाईन या अभ्यासक्रमाच्या 2026–27 शैक्षणिक वर्षासाठीच्या सीईटी प्रवेश नोंदणीला 22 जानेवारी 2026 पासून सुरुवात झाली आहे. या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना 24 फेब्रुवारी 2026 पर्यंत ऑनलाईन नोंदणी करता येणार आहे.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली असून, त्याचाच एक भाग म्हणून बी. डिझाईन अभ्यासक्रमासाठीची नोंदणी सुरु करण्यात आली आहे. गतवर्षी बी. डिझाईन सीईटीसाठी 1 हजार 328 विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती.

सीईटी कक्षाने जाहीर केलेल्या संभाव्य वेळापत्रकानुसार बी. डिझाईनची प्रवेश परीक्षा 5 एप्रिल 2026 रोजी होणार आहे. ही परीक्षा राज्यातील विविध परीक्षा केंद्रांवर ऑनलाईन पद्धतीने घेतली जाणार आहे.या परीक्षेसाठी आवश्यक असलेले ऑनलाईन अर्ज, नोंदणी वेळापत्रक आणि माहिती पुस्तिका राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळावर www.mahacet.ऑर्ग उपलब्ध करून देण्यात आली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी वेळेत नोंदणी करून परीक्षेची तयारी करावी, असे आवाहन सीईटी कक्षाकडून करण्यात आले आहे.

# थकबाकीदारांनो सावधान! पिंपरी चिंचवड महापालिकेने सुरू केली जप्ती कारवाई

➡ शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पिंपरी - पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत मालमत्ता कर वसुलीसाठी जप्ती मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात थकबाकीदारांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून 21 जानेवारी 2026 पासून ही मोहिम शहरभर व्यापक स्वरुपात राबविण्यात येणार आहे.




या संदर्भात झालेल्या आढावा बैठकीत महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर व कर आकारणी व कर संकलन विभागाचे उपायुक्त पंकज पाटील यांनी विभागातील सर्व सहाय्यक मंडल अधिकाऱ्यांना थकबाकीदारांवर कोणतीही सूट न देता कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. या बैठकीस शहरातील 18 विभागीय कार्यालयांतील सहाय्यक मंडल अधिकारी उपस्थित होते.

मालमत्ता कर थकबाकी वसुलीसाठी विभागनिहाय स्वतंत्र पथके तयार करण्यात आली असून, येत्या काही दिवसांत थकबाकीदारांना जप्ती अधिपत्रे बजावण्यात येणार आहेत. अधिपत्र बजावल्यानंतरही जर संबंधित मालमत्ताधारकांनी मालमत्ता कराचा भरणा केला नाही, तर त्यांच्या मालमत्तांवर प्रत्यक्ष जप्तीची कारवाई करण्यात येणार आहे. तसेच या मोहिमेंतर्गत निवासी थकबाकीदारांची नळ कनेक्शन खंडित करणे तसेच बिगरनिवासी थकबाकीदारांच्या मालमत्तांवर थेट जप्ती अशी कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे नागरिकांनी चालू आर्थिक वर्षातील तसेच थकीत मालमत्ता कर तात्काळ भरुन जप्तीची कटू कारवाई टाळावी, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

**35 मालमत्ता जप्त तर 133 नळ कनेक्शन खंडित....**

पिंपरी चिंचवड महापालिकेने कर संकलन मोहिमेला गती दिली असून, या कारवाईसाठी 18 विभागीय कार्यालयांतील सर्व गटप्रमुखांना जबाबदारी देण्यात आली आहे. त्यानुसार शहरातील निवासी व बिगरनिवासी थकबाकीदारांवर कठोर कारवाई सुरु आहे. आतापर्यंत शहरातील 35 मालमत्तांची जप्ती करण्यात आली असून, 133 थकबाकी मालमत्ताधारकांचे नळ कनेक्शन खंडित करण्यात आले आहे.

**थकबाकीदारांची यादी केली जाणार प्रसिद्ध**

ज्या थकबाकीदारांनी अद्यापही मालमत्ता कराचा भरणा केलेला नाही, अशा सर्व थकबाकीदारांची यादी महापालिकेमार्फत प्रसिद्ध केली जाणार आहे. ही यादी प्रसिद्ध केल्यानंतर संबंधित थकबाकीदारांकडून याबाबत करण्यात येणारी कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नसल्याचे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे संबंधित थकबाकीदारांनी जप्तीची कारवाई टाळण्यासाठी तात्काळ थकीत मालमत्ता कराचा भरणा करावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

> "पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विकासासाठी मालमत्ता कर हा अत्यंत महत्त्वाचा महसूल स्रोत आहे. या कराच्या माध्यमातून शहरातील पायाभूत सुविधा, नागरी सेवा, स्वच्छता व्यवस्था, पाणीपुरवठा व शिक्षण व्यवस्था सक्षमपणे राबवली जाते. वारंवार सूचना व नोटिसा देऊनही मालमत्ता कर भरण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर नियमान्वये कारवाई करण्यात येईल."
>
> **तृप्ती सांडभोर,** अतिरिक्त आयुक्त, पिं.चिं.महापालिका

> "मालमत्ता कर थकबाकीदारांची अचूक माहिती, क्षेत्रनिहाय नियोजन आणि वेळापत्रकबद्ध कारवाई या तीन बाबींवर भर देऊन ही मोहीम राबविण्यात येत आहे. प्रत्येक विभागीय कार्यालयामार्फत रोजच्या आढाव्यानुसार प्रगती तपासली जात असून, थकबाकीदारांनी तातडीने कर भरणा केल्यास जप्ती व नळ कनेक्शन खंडित करण्यासारखी कारवाई टाळता येऊ शकेल. त्यामुळे नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने कर भरुन महापालिकेला सहकार्य करावे."
>
> **पंकज पाटील,** उपायुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

# राज्यांतील पत्रकारांच्या शिष्टमंडळाची वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पास भेट

➡ शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शाश्वत घनकचरा व्यवस्थापन व स्वच्छ ऊर्जानिर्मिती क्षेत्रातील कार्यपद्धतींचा अभ्यास करण्यासाठी विविध राज्यांतील पत्रकारांच्या शिष्टमंडळाने मोशी येथील कचऱ्यापासून वीजनिर्मिती (Waste-to-Energy) प्रकल्पाला भेट दिली. या भेटीदरम्यान महापालिकेच्या कचरा व्यवस्थापनाची संपूर्ण साखळी, तांत्रिक प्रक्रिया व त्यातून होणारे पर्यावरणीय लाभ यांची सविस्तर माहिती त्यांनी घेतली.



या अभ्यास भेटीदरम्यान महानगरपालिकेच्या वतीने जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी सर्व पत्रकारांचे स्वागत केले. यावेळी उप अभियंता प्रदीप धेंडे यांच्यासह पंजाबमधील पंजाबी जागरणच्या तेजींदर कौर, पंजाब केसरी ग्रुपच्या वंदना, हिमाचल प्रदेशमधून हिमाचल दस्तकच्या आशा भारद्वाज, दैनिक भास्करच्या आंचल चौहान, चंदीगढमधून दैनिक ट्रीब्युनच्या कविता राज, हिंदुस्थान टाईम्सच्या अनिशा सरीन, द संडे गार्डियनच्या तरुनी गांधी, पीटीआय टीव्हीच्या नेहा शर्मा, अर्थ प्रकाशचे रंजू ऐरी, चंदीगढ पत्र सूचना कार्यालयाच्या संचालिक सपना, कार्यालय सहाय्यक सुनिता मोझा तसेच मोशी येथील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पामध्ये काम करणारे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

महापालिकेच्या विकेंद्रित कचरा व्यवस्थापन मॉडेलमुळे शहरातील सर्व 32 प्रभागांमध्ये 100 टक्के ओला व सुका कचरा वेगळा करून दारोदारी संकलन करण्यात येत असून, 504 जीपीएस सुसज्ज वाहनांद्वारे एकात्मिक आदेश व नियंत्रण केंद्रातून रिअल टाइम देखरेख केली जाते. नागरिकांमध्ये कचरा विभाजनाची सवय निर्माण करण्यासाठी जनजागृती पथके कार्यरत असून, नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईही केली जाते.

पत्रकारांना उप अभियंता प्रदीप धेंडे यांनी माहिती देताना सांगितले की, शहरातून दररोज गोळा होणारा सुमारे 1,440 टन कचरा विविध प्रकल्पांद्वारे पुनर्वापर व ऊर्जा निर्मितीसाठी वापरण्यात येतो.

मोशी येथील 700 टन प्रतिदिन क्षमतेच्या वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पात आतापर्यंत 2 लाख टनांहून अधिक सुका कचरा प्रक्रिया करून 14.55 कोटी युनिट्स वीज निर्मिती करण्यात आली आहे. याशिवाय 500 टन प्रतिदिन क्षमतेचा कंपोस्ट प्रकल्प, 50 टन प्रतिदिन हॉटेल कचऱ्यावर आधारित बायोगॅस प्रकल्प आणि 1,000 टन प्रतिदिन क्षमतेची मटेरियल रिकव्हरी सुविधा कार्यरत आहे.

प्लास्टिक-टू-फ्युएल प्रकल्प, बांधकाम व राडारोडा पुनर्वापर युनिट्स, मॅग्नेटिक प्लाझ्मा तंत्रज्ञानाद्वारे धोकादायक कचऱ्याची प्रक्रिया, ई-कचरा केंद्रातून दुरुस्त केलेले लॅटॉप महापालिका शाळांना देणे तसेच लेगेसी वेस्ट बायो-मायनिंगद्वारे 10 लाख घन मीटरपेक्षा अधिक कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात आल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

या भेटीदरम्यान मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांनी दूरध्वनीद्वारे पत्रकारांशी संवाद साधून वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पाची तांत्रिक बाजू, कार्यक्षमता, पर्यावरणीय परिणाम तसेच पत्रकारांनी उपस्थित केलेल्या शंका व प्रश्नांचे सविस्तर निरसन केले.

या अभ्यास भेटीमुळे पिंपरी चिंचवड महापालिकेचे शाश्वत कचरा व्यवस्थापन मॉडेल इतर राज्यांसाठी मार्गदर्शक ठरत असल्याचे पत्रकारांनी नमूद केले.

# लग्नाचे आमिष दाखवून महिलेची २१ लाखांची फसवणूक

➡ शबनम न्यूज मिडिया ग्रुप

नवऱ्यापासून घटस्फोट मिळवून देण्याचं आमिष दाखवत एका 43 वर्षीय महिलेशी सुरुवातीला भावनिक जवळीक साधून, नंतर लग्नाच्या बहाण्याने तिच्याशी शारीरिक संबंध ठेवून त्याचे फोटो व व्हिडिओ गुपचूप काढल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पुढे हेच फोटो-व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत आरोपीने महिलेकरिता तब्बल 21 लाख 45 हजार रुपयांची खंडणी उकळल्याचा आरोप आहे. पोलिसांनी रोहित उत्तमराव लाडके (वय 32) याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

हा प्रकार 2019 ते जानेवारी 2026 या कालावधीत पुण्यातील फुरसुंगी परिसरात घडल्याचे समोर आले आहे. पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपीने तिचा विश्वास संपादन करून नवऱ्यापासून घटस्फोट मिळवून देत तिच्याशी लग्न करण्याचं आमिष दाखवलं. त्यानंतर तिच्या इच्छेविरुद्ध वेळोवेळी शारीरिक संबंध ठेवले.

या काळात आरोपीने नकळतपणे महिलेचे खासगी फोटो व व्हिडिओ चित्रीत केले. नंतर हेच फोटो आणि




व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल करण्याची धमकी देत त्याने महिलेवर दबाव टाकला. या भीतीपोटी पीडितेने आरोपीला टप्प्याटप्प्याने रोख रक्कम आणि मौल्यवान वस्तू दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

तक्रारीनुसार, आरोपीने रोख 18 लाख रुपये, सोन्या-चांदीचे दागिने, एक मोबाईल फोन आणि दुचाकी असा एकूण 21 लाख 45 हजार रुपयांचा ऐवज उकळला आहे. अखेर मानसिक त्रासाला कंटाळून पीडित महिलेने पोलिसांकडे धाव घेतली.

या प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीविरोधात फसवणूक, बलात्कार, खंडणी, धमकी आणि आयटी ॲक्ट अंतर्गत गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरु आहे.

# प्रेमसंबंधातून तरुणावर तीक्ष्ण शस्त्राने वार

➡ शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पुणे : प्रेमसंबंधातून तरुणावर तीक्ष्ण शस्त्राने वार करण्यात आल्याची घटना मुंढवा भागात घडली. या प्रकरणी टोळक्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, खुनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे.

प्रवीण धनंजय माने (वय 24, रा. श्रीमाननगर, शेवाळवाडी, पुणे-सोलापूर रस्ता) असे गंभीर जखमी झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत माने याने मुंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, माने याचे एका तरुणीशी प्रेमसंबध आहे. आरोपीने माने याला तरुणीशी असलेले प्रेमसंबध तोडण्यास सांगितले होते. 19 जानेवारी रोजी माने याला मुंढव्यात बोलावून घेतले. आरोपी बरोबर असलेल्या साथीदारांनी




माने याला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. त्याच्यावर तीक्ष्ण शस्त्राने वार केले. पोलिसांकडे तक्रार दिल्यास जिवे मारु, अशी धमकी देऊन आरोपी पसार झाले. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली.

माने याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. पसार झालेल्या मुख्य आरोपीला पोलिसांनी अटक केली. त्याच्याबरोबर असलेल्या साथीदारांचा शाेध घेण्यात येत आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता वासनिक यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक पिंगुवाले तपास करत आहेत.

# पिस्तूल बाळगणारा सराईत अटकेत

➡ शबनम न्यूज मिडिया ग्रुप

देशी बनावटीचे पिस्तूल बाळगणाऱ्या सराइताला गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथकाने वारजे माळवाडी भागातून अटक केली. सराइताकडून देशी बनावटीच्या पिस्तुलासह चार काडतुसे जप्त करण्यात आले.



सागर गणेश सुतार (वय 25, रा. दुर्गादेवी मंदिराजवळ, गणपती माथा, वारजे माळवाडी) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे.

सुतार याच्याविरुद्ध वारजे माळवाडी, सिंहगड रस्ता, उत्तमनगर पोलीस ठाण्यात गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. खंडणी विरोधी पथक वारजे भागात गस्त घालत होते. त्यावेळी सुतार याच्याकडे पिस्तूल असून, तो शिवणे परिसरात थांबल्याची माहिती पोलीस हवालदार अमोल आवाड, मयूर भोकरे यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने सापळा लावून त्याला पकडले. त्याची झडती घेण्यात आली. तेव्हा त्याच्याकडे पिस्तूल सापडले. त्याच्याकडून पिस्तुलासह चार काडतुसे जप्त करण्यात आली. सुतार याने पिस्तूल का बाळगले, तसेच त्याने पिस्तूल कोणाकडून आणले ? याद्दष्टीने तपास करण्यात येत आहे. सहायक आयुक्त विजय कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक अश्विनी जगताप, सहायक निरीक्षक राजेश माळगावे, उपनिरीक्षक रामेश्वर पार्वे, पोलीस कर्मचारी सयाजी चव्हाण, बालारफी शेख, दुर्योधन गुरुव, नितीन कांबळे यांनी ही कारवाई केली.

देशी बनावटीचे पिस्तूल बाळगणाऱ्या सराइतांविरुद्ध पोलिसांकडून कारवाई करण्यात येत आहे.

महिनाभरात पिस्तूल बाळगणाऱ्या सराइतांकडून 15 पिस्तुले, तसेच काडतुसे जप्त करण्यात आली.

# मोटारीच्या धडकेत पाच वर्षांच्या बालकाचा मृत्यू

➡ शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पुणे : सोसायटीच्या आवारात खेळणाऱ्या पाच वर्षांच्या बालकाचा मोटारीच्या धडकेत मृत्यू झाल्याची घटना लोणी काळभोर भागात घडली. या प्रकरणी मोटार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. निष्कर्ष आश्वत स्वामी (वय 5) असे मृत्यमुुखी पडलेल्या बालकाचे नाव आहे. याबाबत निष्कर्षचे वडील आश्वत नारायण स्वामी (वय 40,रा. जाॅय नेस्ट सोसायटी, लोणी काळभोर) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिंलेल्या फिर्यादीनुसार, मोटार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आश्वत स्वामी यांचा मुलगा निष्कर्ष याला घेऊन सासू सरस्वती रेड्डी या सोमवारी (19 जानेवारी) दुपारी साडेतीनच्या सुमारास सोसायटीच्या आवारात आल्या होत्या. सोसायटीच्या आवारात निष्कर्ष खेळत होता. त्या वेळी सोसायटीच्या आवारात मोटारीने निष्कर्षला धडक दिली. अपघातात गंभीर जखमी झालेल्या निष्कर्षला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता.




# मोठ्या पडद्यावर 'सुड शकारंभ'ची ठसठशीत छाप

## ज्योती पाटील प्रस्तुत आणि राजनील फिल्म प्रोडक्शन निर्मित या दमदार मांडणीला मिळतोय उत्कृष्ट प्रतिसाद!!

➡ शबनम न्यूज मिडिया ग्रुप

सत्तेच्या संघर्षातून जन्माला आलेली आणि सूडाच्या आगीत आकार घेतलेली कहाणी आता प्रेक्षकांसमोर अखेर उलगडली आहे. ज्योती पाटील प्रस्तुत आणि राजनील फिल्म प्रोडक्शन निर्मित मराठी ॲक्शन-ड्रामा-थ्रिलर 'सुड शकारंभ' हा सिनेमा 16 जानेवारी 2026 रोजी महाराष्ट्रभर प्रदर्शित झाला असून, प्रेक्षकांकडून या चित्रपटाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

ग्रामीण राजकारणाचं भयावह प्रतिबिंब आणि मानवी स्वभावातील बदल प्रभावीपणे मांडल्यामुळे, हा चित्रपट प्रदर्शित होताच प्रेक्षकांमध्ये त्याची मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरु झाली आहे.



सध्या महाराष्ट्रभरच्या चित्रपटगृहात हा सिनेमा प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत असून, सिनेरसिकांकडून सकारात्मक प्रतिक्रिया मिळत आहेत. प्रेक्षकांच्या मते "या चित्रपटाची संकल्पना खूपच वेगळी आणि आजच्या काळाशी भिडणारी आहे. नव्या पिढीला विशेषतः आकर्षित करणारा विषय आहे. सुरुवातीपासून शेवटपर्यंत रहस्य आणि थराराने भरलेली कथा कुठेही सैल होत नाही. सिनेमाचा शेवट इतका धक्कादायक आहे की तो अक्षरशः मन हादरवतो. 'सुड शकारंभ' हा अनुभव मोठ्या पडद्यावरच घ्यायला हवा प्रत्येकाने थिएटरमध्ये जाऊन हा सिनेमा पाहायलाच हवा."

इतकच नव्हे तर चित्रपटाच्या प्रदर्शनादरम्यान झालेल्या एका विशेष स्क्रीनिंगला 'सुड शकारंभ'च्या कलाकारांसह संपूर्ण टीमही उपस्थित होती. या वेळी प्रेक्षकांशी थेट संवाद साधत त्यांनी चित्रपटामागील प्रवास, अनुभव आणि भावना मोकळेपणाने शेअर केल्या. प्रेक्षकांकडून मिळणारा चांगला प्रतिसाद पाहून निर्माते आणि टीम भावूक झाली होती. महाराष्ट्राच्या विविध भागांतील कलाकारांना एकत्र घेऊन असा प्रभावी सिनेअनुभव घडवता आला, याचा त्यांना विशेष आनंद असल्याचं त्यांनी नमूद केलं. चित्रपटाला मिळणाऱ्या प्रेमामागे संपूर्ण टीमची मेहनत, समर्पण आणि एकजूट कारणीभूत असल्याचं सांगत, या यशात प्रत्येक सहकाऱ्याचा वाटा अमूल्य असल्याचं त्यांनी आवर्जून अधोरेखित केलं. या सिनेमात मनीषा मोरे, आयुष उलघडे, ओम पानस्कर, सुनील सूर्यवंशी, ऐश्वर्या मल्लिकार्जुन, सोनाली घाडगे, सलोनी लोखंडे, राज साने आणि मारुती केंगार यांच्या दमदार अभिनयामुळे प्रत्येक पात्र स्वतंत्र ठसा उमटवतं. विकी वाघ यांच्या संगीत आणि पार्श्वसंगीताने कथेला अधिक तीव्रता मिळाली असून, मनीष राजगिरे, हर्षवर्धन वावरे, विकी वाघ आणि मयुरी जाधव यांच्या स्वरांनी गाण्यांना भावनिक खोली लाभली आहे. पॅनोरमा म्युझिकअंतर्गत सिनेमाचं संगीत प्रेक्षकांपर्यंत पोहोचत आहे.

शोएब खतीब यांच्या लेखन-दिग्दर्शनातून जन्माला आलेला हा चित्रपट तीव्रता, वास्तव आणि सिनेमॅटिक भव्यतेचा संगम ठरतो. ज्योती पाटील यांची प्रस्तुती आणि राजनील फिल्म प्रोडक्शनची निर्मिती असून, श्रीराज पाटील व दत्तसंग्राम वासमकर यांनी या प्रवासाला ठोस साथ दिली आहे. रोहण पिंगळ आणि अमेय तानवडे यांच्या कॅमेऱ्यातून ग्रामीण सत्तासंघर्ष जिवंत उभा राहतो, तर रोहित रुकडे यांच्या संकलनामुळे कथेला धार येते. सोनाली घाडगे यांचे कला दिग्दर्शन आणि जीत शहा, दिगंबर शिंदे व ओंकार गूळीक यांचे प्रॉडक्शन मॅनेजमेंट चित्रपटाला भक्कम साथ देते. प्रचारासाठी स्कारलेट स्टुडिओज, पी.आर. प्रज्ञा शेट्टी, अश्मिकी टिळेकर तसेच राजेश मेनन व सनशाईन स्टुडिओझ यांचे मोलाचे योगदान लाभले आहे. सत्तेचा खेळ, सूडाची ज्वाला आणि बदलत्या माणसाची कहाणी 'सुड शकारंभ' आता आपल्या जवळच्या सिनेमागृहात.

# इलेक्शन ड्युटीला दांडी मारणाऱ्या १३२९ कर्मचाऱ्यांना नोटीस

➡ शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पिंपरी - महापालिका निवडणूक प्रक्रियेदरम्यान नियुक्त कर्तव्यांना गैरहजर राहिलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधात प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. महापालिका प्रशासनातर्फे अशा 1 हजार 329 कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून, समाधानकारक उत्तर न दिल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येणार आहे.




निवडणूक ही संविधानिक व कायदेशीर जबाबदारी असतानाही काही कर्मचाऱ्यांनी मतदान व अन्य निवडणूक कामांना दांडी मारल्याचे तपासात उघड झाले आहे. यामध्ये विविध शासकीय विभागांतील कर्मचारी सहभागी असल्याचे समोर आले असून, शिक्षण खात्यातील कर्मचारी सर्वाधिक गैरहजर असल्याची प्राथमिक माहिती आहे. दरम्यान, काही कर्मचाऱ्यांना वैद्यकीय व अत्यावश्यक कारणांमुळे पूर्वपरवानगी देऊन निवडणूक कामातून सूट देण्यात आली होती.

मात्र, काही कर्मचाऱ्यांना कोणतीही पूर्वकल्पना न देता निवडणुकीच्या कामाकाजासाठी दांडी मारली आहे. अशा कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. निवडणूक काम टाळणे हा गंभीर प्रकार आहे. ही केवळ शासकीय नाही, तर संविधानिक जबाबदारी आहे. त्यामुळे दोषी कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई अटळ आहे.

# पिंपरी-चिंचवडचा निकाल : आकड्यांआड दडलेला जनतेचा पराभव

## संपादकीय

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीचा निकाल मागील आठवड्यात जाहीर झाला आणि पुन्हा एकदा भारतीय जनता पक्षाने महापालिकेवर आपले वर्चस्व सिद्ध केले. भाजपला तब्बल 85 जागांवर यश मिळाले, तर भाजपविरोधात लढणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसला 36 जागांवरच समाधान मानावे लागले. विशेष म्हणजे 2017 च्या निवडणुकीतही राष्ट्रवादी पक्षाला एवढ्याच जागा मिळाल्या होत्या. सत्तासंघर्षाच्या या राजकीय लढतीत आकडे जरी महत्त्वाचे असले, तरी या निकालात काही असे पराभव आहेत, जे केवळ उमेदवारांचे नसून थेट जनतेच्या अपेक्षांचे आणि विकासाच्या शक्यतांचे पराभव म्हणावे लागतील.

या निकालातील दोन धक्कादायक पराभव विशेषत्वाने अधोरेखित करावे लागतील. प्रभाग क्रमांक 15 मधील राष्ट्रवादीच्या अधिकृत उमेदवार सरिता अरुण साने आणि प्रभाग क्रमांक 5 मधील माजी नगरसेविका प्रियंका ताई प्रवीण बारसे यांचा पराभव अनेकांना चटका लावणारा ठरला आहे. या दोन्ही महिला उमेदवारांनी केवळ निवडणूक जिंकण्यासाठी नव्हे, तर प्रभागाचा दीर्घकालीन विकास डोळ्यांसमोर ठेवून निवडणूक लढवली होती.

प्रियंका ताई प्रवीण बारसे यांनी प्रभाग क्रमांक 5 मध्ये शिक्षण आणि आरोग्य या दोन अत्यंत मूलभूत आणि जिव्हाळ्याच्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित केले होते. सामान्य व मध्यमवर्गीय कुटुंबातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे, त्यांच्या आरोग्याच्या सोयी-सुविधा मजबूत व्हाव्यात, यासाठी ठोस आराखडा त्यांनी मांडला होता.

प्रचारादरम्यान त्यांनी मतदारांशी थेट संवाद साधत विकासाची दिशा स्पष्ट केली होती. मात्र, राजकीय डावपेच, समीकरणे आणि विरोधकांच्या रणनीतीसमोर त्यांचा पराभव झाला.

त्यामुळे हा पराभव केवळ प्रियंका ताईंचा नसून, प्रभाग क्रमांक 5 मधील प्रत्येक विकासाभिलाषी मतदाराचा पराभव आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

दुसरीकडे, प्रभाग क्रमांक 15 मध्ये सरिता अरुण साने यांनी *'सरिता साने सखी मंच'*च्या माध्यमातून महिलांचे संघटन उभे केले. महिलांचे आरोग्य, स्वावलंबन आणि रोजगार यासाठी त्यांनी सातत्याने सामाजिक उपक्रम राबविले. अनेक महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत त्यांचे जीवनमान उंचावण्याचा त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केला. आपल्या प्रभागात सांस्कृतिक भवन उभारण्याचे स्वप्न त्यांनी पाहिले होते, जे प्रभागाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक विकासासाठी मैलाचा दगड



ठरले असते. मात्र, या रणरागिणी महिला उमेदवारालाही राजकारणाच्या गुंतागुंतीत बळी जावे लागले.या दोन्ही उमेदवारांची समान ओळख म्हणजे लोकांसाठी रात्रंदिवस धावणारे नेतृत्व, अडचणीच्या वेळी मदतीचा हात आणि विकासाचा स्पष्ट दृष्टिकोन. अशा सक्षम, संवेदनशील आणि काम करणाऱ्या महिलांचा पराभव हा लोकशाहीसाठी चिंतेचा विषय आहे. आज कदाचित निकाल जाहीर झाला असेल, परंतु उद्या जेव्हा विकासाचे प्रश्न ऐरणीवर येतील, तेव्हा या दोन्ही प्रभागांतील मतदारांना पश्चात्ताप झाल्याशिवाय राहणार नाही, अशीच एकंदर परिस्थिती दिसून येत आहे.

यानिकालातून एक कठोर सत्य समोर येते : पिंपरी-चिंचवडसारख्या महानगरातही मतदारांचा निर्णय स्थानिक प्रश्नांपेक्षा पक्षाच्या 'ब्रँड'वर अधिक अवलंबून आहे.

विकासकामे, सामाजिक उपक्रम आणि स्थानिक नेतृत्व यांना दुय्यम स्थान मिळाले. त्यामुळे भाजपचा विजय हा पक्षाचा नसून विरोधकांच्या अपयशातून मिळालेला विजय अधिक वाटतो.

राष्ट्रवादी काँग्रेससाठी हा निकाल आत्मपरीक्षणाचा इशारा आहे.

सक्षम, जमिनीवर काम करणाऱ्या उमेदवारांना पुरेसे संघटनात्मक पाठबळ मिळाले का? प्रचाराची दिशा स्पष्ट होती का? स्थानिक नेतृत्वाला स्वतंत्र ओळख निर्माण करून दिली गेली का? या प्रश्नांची उत्तरे 'नाही' अशीच मिळाल्यास, असे पराभव पुढेही अटळ ठरणार आहेत. आज कदाचित सत्ता एका पक्षाकडे गेली असेल, परंतु उद्या जेव्हा प्रभाग क्रमांक 5 आणि 15 मध्ये शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि सांस्कृतिक सुविधांचे प्रश्न ऐरणीवर येतील, तेव्हा या निकालाचे खरे राजकीय मूल्यांकन होईल. तेव्हा हा विजय उत्सवापेक्षा एक हरवलेली संधी म्हणून अधिक आठवला जाईल, अशीच चिन्हे सध्याच्या परिस्थितीत दिसत आहेत.

# थेरगावच्या संभाजी बारणे यांचा शिवचरित्र पुस्तकांचा विक्रमी संग्रह

### छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित तब्बल ५०१ पुस्तकांचे संकलन

शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पिंपरी-चिंचवड शहरातील थेरगाव परिसरात वास्तव्यास असलेले सर्वपरिचित सामाजिक कार्यकर्ते, लेखक, कवी, राजकीय नेते व संस्थाचालक संभाजी बाळासाहेब बारणे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित 501 शिवचरित्र पुस्तकांचे संकलन करून एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. शिवाजी महाराजांवर आधारित एवढ्या मोठ्या प्रमाणावर पुस्तकांचे संकलन ही कामगिरी 'रेकॉर्ड ब्रेक' मानली जात आहे.




संभाजी बारणे हे थेरगाव परिसरातील प्रभावी आणि सर्वपरिचित व्यक्तिमत्त्व आहेत. सामाजिक क्षेत्रात कार्य करत असतानाच त्यांनी आपल्या छंदाला जपले असून विविध वस्तूंच्या संकलनासाठी त्यांना यापूर्वीही अनेक पुरस्कार व गौरव प्राप्त झाले आहेत.

यापूर्वी सन 2019 मध्ये त्यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील सर्व नगरसदस्यांच्या व्हिजिटिंग कार्ड्सचे संकलन करून विक्रम आपल्या नावावर नोंदवला होता. त्यानंतर आता छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित पुस्तकांचे भव्य संकलन करत त्यांनी पुन्हा एकदा शहराचे लक्ष वेधून घेतले आहे.

शिवाजी महाराजांवर आधारित शंभर-दोनशे नव्हे, तर हजारोंच्या संख्येने ग्रंथ एकत्र आणणे ही बाब अत्यंत दुर्मिळ असून संभाजी बारणेंची ही कामगिरी इतिहास, वाचनसंस्कृती आणि शिवविचारांचे जतन करणारी ठरते.

संभाजी बारणे हे थेरगावमधील एक प्रभावी व सर्वपरिचित व्यक्तिमत्त्व त्यांनी आपला वैचारिक छंद जपला आहे. इतिहासाविषयीची आस्था, संशोधनवृत्ती आणि जतनाची मानसिकता यातूनच हा भव्य संग्रह साकार झाला आहे.

या संग्रहामध्ये शिवाजी महाराजांचे बालपण, स्वराज्य स्थापनेचा संघर्ष, विविध लढाया, आग्र्याहून सुटका, तसेच किल्ल्यांवरील मोहिमा यांसह शिवकालीन इतिहासावर आधारित असंख्य ग्रंथांचा समावेश आहे. याशिवाय शिवकालीन नाणींचेही संकलन आपण करीत असल्याची माहिती संभाजी बारणे यांनी दिली.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित या पुस्तकांमध्ये प्रसिद्ध लेखक निनाद बेडेकर, नामदेवराव जाधव, सेतू माधवराव पगडी, इस्माईल पठाण, राजपाध्ये अंजली, वैद्य ची.वी. यासारख्या अनेकांचे पुस्तक संभाजी बारणे यांच्याकडे संकलित आहेत , या संकलनात डॉक्टर रवींद्र ठिपसे यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले असल्याची माहिती संभाजी बारणे यांनी दिली आहे.

**केवळ पुस्तकेच नव्हे, शिवकालीन नाण्यांचाही संग्रह**

संभाजी बारणे यांनी माहिती देताना सांगितले की, "हा संग्रह केवळ पुस्तकांपुरता मर्यादित नाही. शिवकालीन नाणी, ऐतिहासिक वस्तू यांचेही मी संकलन करीत असून हा ठेवा भविष्यात अभ्यासक व तरुण पिढीसाठी खुला करण्याचा मानस आहे."

### वाचनसंस्कृतीसाठी प्रेरणादायी उपक्रम


"आपल्या प्रतिक्रियेत संभाजी बारणे म्हणाले, "छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन हे केवळ इतिहास नाही, तर आजच्या काळासाठी मार्गदर्शक आहे. प्रत्येकाने शिवचरित्र वाचावे, विचार आत्मसात करावेत आणि आचरणात आणावेत, हाच माझ्या या संग्रहामागचा उद्देश आहे." त्यांच्या या इतिहासप्रेमी, वैचारिक व प्रेरणादायी उपक्रमामुळे संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरात त्यांचा नावलौकिक वाढला असून सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातून त्यांच्या कार्याचे कौतुक होत आहे. इतिहास जपण्याची आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याची ही चळवळ ठरावी, अशी भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

आगामी काळात छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर आधारित ही सर्व शिवचरित्र पिंपरी चिंचवड शहरातील वाचकांसाठी उपलब्ध करून देणार असल्याचे संभाजी बारणे यांनी सांगितले आहे."

# शिवसेना शिंदे गटाचा सर्वांचे लक्ष वेधून घेणारा विजय

शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणूक अखेर संपन्न झाली असून निकालांमध्ये भारतीय जनता पक्ष पुन्हा एकदा शहरातील सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर आला आहे. भाजपपाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेस हा दुसऱ्या क्रमांकाचा मोठा पक्ष ठरला आहे. मात्र या निकालांमध्ये सर्वाधिक चर्चेत राहिला तो प्रभाग क्रमांक 16 मधील शिवसेना (शिंदे गट) चा अनपेक्षित आणि निर्णायक विजय.



प्रभाग क्रमांक 16 मध्ये गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे यांचे वर्चस्व राहिले होते. मात्र यंदाच्या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाने तीन नवीन उमेदवारांना संधी देत राजकीय गणित पूर्णपणे बदलून टाकले. शिवसेनेचे शहराध्यक्ष निलेश तरस यांनी पहिल्यांदाच महापालिका निवडणूक लढवत बलाढ्य मानले जाणारे मोरेश्वर भोंडवे यांचा पराभव केला.

विकासाचे स्पष्ट आराखडे, प्रभावी डावपेच आणि मतदारांशी थेट संवाद या त्रिसूत्रीमुळे निलेश तरस यांना यश मिळाले.

याच प्रभागात शिवसेनेचे शहर उपप्रमुख राजेंद्र तरस यांच्या पत्नी ऐश्वर्या तरस यांनीही राष्ट्रवादीच्या जयश्री भोंडवे यांचा पराभव करत विजय मिळवला. विशेष बाब म्हणजे, अनेक वर्षे राष्ट्रवादीकडून सामाजिक उपक्रम राबविणारे बापू दिनकर कातळे यांच्या पत्नी सौ. रेश्मा बापू कातळे यांना ऐनवेळी शिवसेनेची उमेदवारी देण्यात आली आणि त्यांनी भाजपच्या माजी नगरसेविका संगीता भोंडवे यांचा दारुण पराभव केला. यामुळे प्रभाग 16 मध्ये शिवसेनेने संपूर्ण वर्चस्व प्रस्थापित केले.

**शिवसेना शिंदे गटाची शहरात दमदार कामगिरी**

या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाचे एकूण सहा उमेदवार विजयी झाले असून ही कामगिरी पक्षाच्या अपेक्षेपेक्षा निश्चितच भरीव ठरली आहे.

प्रभाग क्रमांक 24 मधून खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांचे चिरंजीव विश्वजीत बारणे यांनी पहिल्यांदाच निवडणूक लढवत भाजपचे सिद्धेश्वर बारणे यांचा एकतर्फी पराभव केला. याच प्रभागातून खासदारांचे पुतणे निलेश बारणे यांनीही अपक्ष उमेदवार गणेश गुजर यांचा पराभव करत आपली विजयी घोडदौड कायम ठेवली.

**प्रभाग 13 मध्ये दिग्गजांमध्ये थेट लढत**

सर्वाधिक लक्षवेधी लढत ठरली ती प्रभाग क्रमांक 13 मधील. शिवसेनेच्या ज्येष्ठ नेत्या सुलभा उबाळे विरुद्ध मनसेच्या माजी नगरसेविका अश्विनी चिखले यांच्यात झालेल्या या चुरशीच्या लढतीत सुलभा उबाळे यांनी बाजी मारली.

सुलभा उबाळे यांना 9,104 मते मिळाली, तर अश्विनी चिखले यांना 7,383 मते मिळाली.

**चार वर्षांच्या विलंबानंतरचा निकाल आणि शिंदे गटाची ताकद**

तब्बल चार वर्षांच्या विलंबानंतर झालेल्या या महापालिका निवडणुकीत शिवसेना दोन गटांत विभागलेली असताना पिंपरी-चिंचवड शहरात शिंदे गट किती प्रभाव टाकतो याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. निकालांनी स्पष्ट केले की, शिवसेना शिंदे गटाने अपेक्षेपेक्षा चांगली कामगिरी करत सहा नगरसेवक महापालिका सभागृहात पाठवले आहेत.या यशामागे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांची संघटनात्मक ताकद आणि नेतृत्व निर्णायक ठरल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.




# २०२६ च्या निवडणुकीत तब्बल ६४ नवे नगरसेवक सभागृहात

शबनम न्यूज मिडिया ग्रुप

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या 2026 च्या निवडणुकीत राजकारणात नव्या पर्वाची सुरुवात झाल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. या निवडणुकीत एकूण 64 नवे नगरसेवक प्रथमच महापालिका सभागृहात प्रवेश करणार असून, त्यामुळे शहराच्या कारभारात नव्या विचारांना, नव्या ऊर्जेला आणि नव्या नेतृत्वाला संधी मिळाली आहे.

हे सर्व नवे नगरसेवक भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेनेस या तीन प्रमुख पक्षांचे असून, मतदारांनी यंदा अनुभवी चेहऱ्यांपेक्षा नव्या, तरुण आणि सक्रिय नेतृत्वावर अधिक विश्वास दाखवला असल्याचे निकालातून स्पष्ट झाले आहे. बदलत्या अपेक्षा, विकासाभिमुख दृष्टिकोन आणि स्थानिक प्रश्नांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या उमेदवारांना मिळालेला हा कौल, आगामी पंचवार्षिक कार्यकाळात महापालिकेच्या निर्णयप्रक्रियेला नवी दिशा देणारा ठरणार आहे.एकूणच, 2026 ची निवडणूक ही केवळ सत्तांतर किंवा संख्याबळापुरती मर्यादित न राहता, पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात नव्या नेतृत्वाच्या उदयाची ठोस नोंद ठरली आहे.पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या 2026 च्या या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने शहरावर आपले निर्विवाद वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. भाजपने तब्बल 85 जागांवर विजय मिळवत महापालिकेतील सत्ता अधिक मजबूत केली आहे. तर भाजपविरोधात लढणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला 36 जागांवर समाधान मानावे लागले तर शिवसेनेचे 6 उमेदवार निवडून आले आहे.

**प्रभागनिहाय नवे चेहरे**

नवीन नगरसेवकांमध्ये प्रभाग क्रमांक 1 मधून राष्ट्रवादीचे विकास साने, यश साने आणि भाजपच्या सोनम मोरे यांचा समावेश आहे. प्रभाग क्रमांक 2 मधून भाजपच्या सारिका बो-हाडे, सुजाता बोराटे व निखिल बो-हाडे यांनी विजय मिळवला.

प्रभाग क्रमांक 3 मधून भाजपच्या सारिका गायकवाड, अर्चना सस्ते आणि सचिन तापकीर निवडून आले.

प्रभाग क्रमांक 4 मधून श्रुती डोळस, कृष्णा सुरकुले व उदय गायकवाड यांनी सभागृहात प्रवेश केला.

प्रभाग क्रमांक 5 मधून भाजपच्या कविता भोंगाळे, तर प्रभाग क्रमांक 6 मधून रेखा देवकर व राजश्री लांडगे व योगेश लांडगे विजयी ठरल्या. प्रभाग क्रमांक 7 मधून राष्ट्रवादीचे विराज लांडे आणि भाजपच्या राणी पठारे निवडून आल्या.

प्रभाग क्रमांक 8 मधून भाजपचे डॉ. सुहास कांबळे, तर राष्ट्रवादीच्या अश्विनी वाबळे व तुषार सहाने यांचा समावेश आहे. प्रभाग क्रमांक 9 मधून सिद्धार्थ बनसोडे आणि राष्ट्रवादीच्या सारिका मासुळकर, तर प्रभाग क्रमांक 10 मधून भाजपच्या सुप्रिया चांदगुडे या बिनविरोध निवडून आल्या भाजप चे कुशाग्र कदम, प्रभाग क्रमांक 11 मधून भाजपच्या रिटा सानप व निलेश नेवाळे, तर प्रभाग क्रमांक 12 मधून शीतल वर्णेकर व शिवानी नरळे यांनी विजय मिळवला. प्रभाग क्रमांक 13 मधून भाजपचे अनिल घोलप व अर्चना करांडे, प्रभाग क्रमांक 14 मधून भाजपचे कैलास कुटे व राष्ट्रवादीच्या अरुणा लंगोटे निवडून आल्या.

प्रभाग क्रमांक 16 मधून भाजपचे धर्मपाल तंतरपाळी, शिवसेनेच्या ऐश्वर्या तरस, रेश्मा कातळे व शहराध्यक्ष निलेश तरस हे नवे चेहरे आहेत.

प्रभाग क्रमांक 17 मधून पल्लवी वाल्हेकर व राष्ट्रवादीचे शेखर चिंचवडे, प्रभाग क्रमांक 18 मधून मनीषा चिंचवडे, तर प्रभाग क्रमांक 19 मधून भाजपच्या मधुरा शिंदे व मंदार देशपांडे आणि राष्ट्रवादीच्या सविता आस्वानी यांनी यश संपादन केले. प्रभाग क्रमांक 20 मधून राष्ट्रवादीच्या मनीषा लांडे व वर्षा जगताप, प्रभाग क्रमांक 21 (पिंपरी) मधून प्रियंका कुदळे, प्रभाग क्रमांक 22 मधून भाजपच्या कोमल काळे, तर प्रभाग क्रमांक 23 मधून राष्ट्रवादीच्या योगिता बारणे निवडून आल्या.

प्रभाग क्रमांक 24 मधून भाजप पुरस्कृत अपक्ष शालिनी गुजर, प्रभाग क्रमांक 25 मधून कुणाल वाव्हळकर, रेश्मा भुजबळ व श्रुती वाकडकर, तर प्रभाग क्रमांक 26 मधून भाजपच्या स्नेहा कलाटे यांनी सभागृहात प्रवेश केला. प्रभाग क्रमांक 27 मधून भाजपच्या अर्चना तापकीर व राष्ट्रवादीचे सागर कोकणे, प्रभाग क्रमांक 28 मधून अनिता काटे व कुंदा भिसे निवडून आल्या. प्रभाग क्रमांक 29 मधून भाजपच्या रवीना आंगोळकर व शाम जगताप, प्रभाग क्रमांक 30 मधून राष्ट्रवादीच्या प्रतीक्षा जवळकर, प्रभाग क्रमांक 31 मधून राष्ट्रवादीच्या दीप्ती कांबळे व भाजपच्या ज्ञानेश्वर जगताप आणि पल्लवी जगताप विजयी ठरल्या.

प्रभाग क्रमांक 32 मधून भाजपच्या तृप्ती कांबळे आणि राष्ट्रवादीच्या उज्चला ढोरे या नव्या नगरसेवक म्हणून सभागृहात दिसणार आहेत.

**तरुणांना संधी, नव्या नेतृत्वाची सुरुवात**

एकूणच, 2026 ची पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक ही भाजपच्या सत्तेची पुनःपुष्टी करणारी ठरली, तसेच मतदारांनी नव्या व तरुण चेहऱ्यांवर विश्वास टाकत शहराच्या राजकारणात नव्या नेतृत्वाची पायाभरणी केली असल्याचे स्पष्ट झाले आहे.

साप्ताहिक शबनम न्यूज बातमीपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक सय्यद रफिक हुसेन व संपादिका शबनम सय्यद यांनी सनशाईन ग्राफिक्स डिझाईन प्रिंटिंग प्रेस येथे छापून 16 नंबर बस स्टॉप जवळ थेरगाव , पिंपरी चिंचवड ,पुणे-33 येथून प्रकाशित केले आहे.
सदर अंकातील बातमी, मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही (न्याय कक्षा पुणे न्यायालय) अधिक माहितीसाठी संपर्क 9075624359/7218327321

Shabnam news a weekly newspaper, printed publish and owned by Sayyed Rafique Hussain and editor Shabnam Sayyed, printed at Sunshine graphics printing press and published near,16 number bus stop, thergaon ,Chinchwad Pune 33, ,(responsible for editorial content as per PRB act.) newspaper legal cases will be settled in Pune court
Email - shabnamnews2015@gmail.com Website : shabnamnewsonline.in RNI.NO.MHAMAR/2015/47384